# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 10.09.2026** **वार : गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधानांच्या राजकीय जीवनाला 25 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त भाजपचं सेवा संकल्प अभियान.
2. क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय समावेशनाला नवी दिशा मिळेल; मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन.
3. मराठा समाजाच्या 80 टक्के मागण्या पूर्ण; चर्चेचा मार्ग स्वीकारण्याचं सरकारचं आवाहन.
4. यंदाचा ऊस गळीत हंगाम 15 ऑक्टोबरपासून सुरू होणार.

**'सेवा संकल्प अभियान'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस आणि त्यांच्या सार्वजनिक जीवनातील 25 वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानिमित्त, भाजपाच्या वतीने येत्या 17 तारखेपासून एक महिनाभराचं 'सेवा संकल्प अभियान' सुरू होणार आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. पंतप्रधान मोदी यांनी 2001 मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आपला कार्यकाळ सुरू केला होता. गेल्या 25 वर्षांत 'जनसेवेकडून राष्ट्रसेवेकडे' या मंत्राचा आधार घेत पंतप्रधान मोदींनी आपली सेवायात्रा अविरतपणे सुरू ठेवली आहे. मोदी यांच्या राजकीय जीवनाला येत्या 7 ऑक्टोबर रोजी 25 वर्ष पूर्ण होत आहेत.

**रेल्वे प्रकल्प मंजुरी**

केंद्रीय मंत्रिमंडळाने 20 हजार 700 कोटी रुपये खर्चाच्या 8 रेल्वे प्रकल्पांना काल मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत ही माहिती दिली. अधिक वर्दळीच्या सात रेल्वे मार्गांच्या चौपदरीकरणाला काल मंजुरी देण्यात आली असून यात दिल्ली-मुंबई, मुंबई-चेन्नई, चेन्नई-कोलकाता आणि कोलकाता-दिल्ली सुवर्ण चतुष्कोन रेल्वेमार्गाचा समावेश आहे.

**मुख्यमंत्री फडणवीस**

एजेंटिक एआय आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय समावेशनाला नवी दिशा मिळेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते काल मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये बोलत होते. क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय क्षेत्रात मोठं परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता आहे; तंत्रज्ञानातील क्षमता प्रत्यक्ष परिणामांमध्ये रूपांतरित करणं ही काळाची गरज आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. डेल्टा ॲक्टबाबतही त्यांनी माहिती दिली.

**उप-मुख्यमंत्री**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ब्रिटनच्या संसदेत- 'कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशीप' आणि 'स्टेट्समनशिप अवॉर्ड' या दोन विशेष पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं. शिंदे यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात राबवलेल्या विविध योजनांकरता त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**न्यायमूर्ती शपथविधी**

न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांनी काल मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी त्यांना शपथ दिली. न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती होते.

**पोषण मास**

9 व्या राष्ट्रीय पोषण महिन्याचा प्रारंभ केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्रालयाने काल उत्तर प्रदेशातील वाराणसी इथून केला. केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या कार्यक्रमाचं उद्घाटन केलं. यंदाच्या पोषण मासाचा संकल्प 'आमची अंगणवाडी-आमची जबाबदारी' असल्याचं मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी यावेळी सांगितलं.

***इस वर्ष पोषण माह का हमारा संकल्प है। 'हमारी आंगनबाड़ी हमारी जिम्मेदारी' जिसमें हमारा विशेष ध्यान, विविधतापूर्ण और प्रोटीन युक्त आहार, आंगनबाड़ी केंद्रों पर ताजा गर्म पौष्टिक भोजन, ईसीसीई और गर्भवती व धात्री माताओं की समग्र देखभाल पर केंद्रित रहेगा।***

**पोषण मास-उपक्रम**

राज्यातही ठिकठिकाणी पोषण महिन्याच्या अनुषंगानं विविध उपक्रम राबवले जात आहेत. अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून गर्भवती महिला, स्तनदा माता आणि किशोरवयीन मुली यांच्या पोषण आणि आरोग्यविषयक जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पालघर मध्ये सुदृढ बालकांना 'पोषण अभियाना'चे सदिच्छा दूत बनवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

राष्ट्रीय पोषण मास 2025 अंतर्गत प्रभावी कामगिरी करत हिंगोली जिल्ह्याने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

**ऊस गळीत हंगाम**

राज्यात यंदाचा ऊस गळीत हंगाम 15 ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या ऊस गळीत हंगाम बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. साखरेचा तुटवडा निर्माण होऊन झालेल्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर गळीत हंगामाच्या या बैठकीला विशेष महत्व प्राप्त झालं होतं.

**अमरावती कारवाई**

अमरावती अग्निकांड प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य विभागाने दिले आहेत. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू विशेष काळजी कक्षात 24 ऑगस्ट रोजी लागलेल्या

आगीत तीन बालकांचा मृत्यू झाला होता; या घटनेची चौकशी पूर्ण होऊन उच्चस्तरीय चौकशी अहवाल आला आहे. अकोला परिमंडळ आरोग्य सेवा उपसंचालक; अमरावतीच्या स्त्री रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, प्रशासकीय अधिकारी आणि वीजतंत्री यांच्या निलंबनाचे आदेश शासनाने दिले आहेत. एओव्ही इंटरनॅशनल आणि शिलार कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**मराठा आरक्षण**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारची भूमिका अत्यंत लवचिक असून, आतापर्यंत मराठा समाजाच्या तब्बल 80 टक्के मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी मागण्यांबाबतचा ताठरपणा सोडून चर्चेचा मार्ग स्वीकारावा, असं आवाहन जलसंपदा मंत्री आणि नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनीही केलं आहे. राज्यातली संभाव्य दुष्काळ परिस्थिती आणि सणासुदीच्या काळात मुंबईत आंदोलन करु नये, असही महाजन म्हणाले.

दरम्यान मराठा आरक्षणासंदर्भात मंत्री उदय सामंत, आमदार प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर मध्ये काल बैठक घेण्यात आली. मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील दूरदृष्य संवाद पद्धतीने यात सहभागी झाले होते.

आजपासून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात जात प्रमाण पत्राच्या वाटपात शून्य प्रलंबित्व ठेवण्यासाठी प्रशासनाने 8 जिल्ह्यात शिबिर आयोजित केली आहेत. एकही प्राप्त अर्ज निर्णयाविना शिल्लक राहणार नाही, असं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे.

**वनमानव-सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्गमधल्या दोडामार्गच्या तिलारी जंगलात दुर्मिळ 'वनमानव' अर्थात स्लेंडर लॉरिसचं दर्शन झालं आहे. यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या तिलारी खोऱ्यातली जैवविविधता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***समृद्ध जैवविविधतेसाठी प्रसिद्ध असलेल्या तिलारी खोऱ्यामध्ये निसर्ग अभ्यासक 'नाईट ट्रेल'साठी गेले असता त्यांना वनमानवच्या जोडीच दर्शन झाल. या अनपेक्षित दर्शनान निसर्गप्रेमींना अत्यंत सुखद धक्का बसला आहे. 'स्लेंडर लॉरिस' अर्थात वनमानव हा मुख्यत्वे दक्षिण भारत आणि श्रीलंकेतल्या घनदाट जंगलांत आढळणारा एक अत्यंत दुर्मिळ आणि लहान आकाराचा सस्तन प्राणी आहे. मराठीत किंवा स्थानिक भाषेत याला 'वनमानव' किंवा 'लाजवंती' म्हणूनसुद्धा ओळखल जात. दोडामार्ग तालुक्यात केर पासून मांगेली ते गोव्याच्या सीमेवरच्या विर्डी पर्यंत यांची नोंद आढळते. पण सातव्या अधिसूचनेत नेमका हाच भाग इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये समाविष्ट केलेला नाही. याच भागात आढळणाऱ्या पट्टेरी वाघ, किंग कोब्रा, ब्लॅक पॅन्थर, हत्ती, वनमानव अशा दुर्मिळ प्राण्यांची नोंद शेड्युल वन मध्ये आहे. या प्राण्यांचा प्रजनन अधिवास या भागात आढळतो. त्यामुळे हा भाग इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये समाविष्ट करावा अशी मागणी निसर्ग अभ्यासक आणि पर्यावरण प्रेमींनी केली आहे. तिलारीला महाराष्ट्राचं अमेझॉन समजलं जातं. त्यामुळे इथं आढळणाऱ्या अशा शेड्युल वन मधल्या प्राण्यांचं संरक्षण करायचं असेल तर या भागाचा इको सेन्सेटिव्ह***

***झोन मध्ये समावेश करण्याची गरज वनमानवाच्या दर्शनामुळे अधोरेखित झाली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी निलेश जोशी, सिंधुदुर्ग.***

**चित्रपट पुरस्कार**

आशय, वैविध्य आणि प्रयोगशीलता ही मराठी चित्रपटांची वैशिष्ट्ये आहेत, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत काढले. 62 व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी पं. हृदयनाथ मंगेशकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, अभिनेता प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार, सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार आणि डॉ.राणी मुखर्जी यांना राजकपूर विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. सलीम खान यांच्या वतीने अभिनेत्री हेलन यांनी जीवनगौरव पुरस्कार स्वीकारला.

**वाद्य पूजन**

'डीजे संस्कृती संपवूया, पारंपारिक संस्कृती जपूया' या उपक्रमांतर्गत सांगलीतील मारुती चौक इथे काल पारंपारिक वाद्यांचं पूजन आमदार सदाभाऊ खोत यांच्या हस्ते करण्यात आलं. ढोल-ताशा, हलगी, संबळ, बँजो, पारंपारिक वाद्ये, लेझीम अशा विविध वाद्यांचा पूजन तसंच सादरीकरण करण्यात आलं.

**बैलपोळा**

राज्यात विविध भागात बैल पोळ्याचा सण आज उत्साहात साजरा होत आहे. बळीराजाला शेतीकामात मदत करणाऱ्या सर्जा-राजाची वाजत गाजत मिरवणूक काढून, त्यांना गोडाचा घास भरवला जाणार आहे.

**एम.पी.एस.सी.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची 'गट-क सेवा' संयुक्त पूर्व परीक्षा  आता 3 जानेवारी 2027 रोजी होणार आहे. यापुर्वी ही परिक्षा 25 ऑक्टोबर 2026 रोजी नियोजित होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने  काल ही माहिती देण्यात आली आहे. गट क सेवेमध्ये लिपिक टंकलेखक, ग्राम महसूल अधिकारी, कर सहाय्यक अशा विविध पदांसाठी एकंदर 12 लाख अर्ज दाखल झाले आहेत.

दरम्यान, एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकारा विरोधात काल नाशिकमध्ये आंदोलन करण्यात आलं. यावेळी विविध 18 मागण्यांचं निवेदन विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलं.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात आज पावसाची शक्यता आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**